आंध्र जमातीतील सामाजिक परिवर्तन आणि विकासाचा तौलानिक अभ्यास

(विशेष संदर्भ नांदेड जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
मानव्य विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी
संपादन करण्याकरिता सादर करण्यात येणारा संशोधन आराखडा

•संशोधक•
अरुण लक्ष्मीनारायण धकाते

•मार्गदर्शक•
डॉ. शेकोबा परशुराम ढोले
सहायक प्राध्यापक
श्री.दत्त कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हदगाव

संशोधन केंद्र
सामाजिकशास्त्रे विद्या संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
मार्च २०२२

अनुक्रमणिका

अ.क्र.	विवरण	पृष्ठ क्रमांक
१	प्रस्तावना	१
२	अध्ययन विषयाची निवड	७
३	अध्ययन विषयाची उद्दिष्टे	९
४	अध्ययन विषयाची गृहितकृत्ये	९
५	अध्ययनाचे महत्त्व	१०
६	अध्ययनाची व्याप्ती व मर्यादा	१०
७	पूर्व संशोधन व संबंधित साहित्य आढावा	११
८	संशोधन पद्धती ८.१ अध्ययन क्षेत्र ८.२ संशोधन आराखडा ८.३ नमुना निवड ८.४ तथ्य संकलन	१२ १३ १३ १३ १३
९	प्रकरण रचना	१४
१०	संदर्भ ग्रंथसूची	१६

१) प्रस्तावना

आदिम म्हणजे प्रथम होय. आदिम समाजास आदिवासी संबोधण्यात येते. भारतीय संविधानाच्या ३४२ व्या कलमानुसार आदिम जमातींना अनुसूचित जमाती म्हणून परिभाषित केलेले आहे. भारतात सुमारे सातशे आदिवासी जमाती असून त्यामध्ये गोंड, राजगोंड, कोरकू, मीना, भिल्ल, मुंडा, गारो, खासी इत्यादी प्रमुख आदिवासी जमाती आहेत. सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतात आदिवासींची लोकसंख्या १०,४२,८१,०३४ नोंदविलेली आहे. भारतातील एकूण लोकसंख्येच्या सुमारे शेकडा ८.६ लोकसंख्या आदिवासी जमातीची आहे. सन २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार सर्वाधिक आदिवासी लोकसंख्या असणारे राज्य मध्यप्रदेश असून शेकडा प्रमाण १४.६ आहे. मध्यप्रदेशनंतर आदिवासी लोकसंख्या जास्त असणारे राज्य म्हणजे महाराष्ट्र.

महाराष्ट्रात एकूण ४५ आदिवासी जमाती गट असून उपगटांची संख्या १५० आढळून येते. सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात १,०५,१०,२१३ आदिवासी जमातीची लोकसंख्या आहे. एकूण लोकसंख्येच्या शेकडा ८.६ आदिवासी लोकसंख्या महाराष्ट्रात आहे. महाराष्ट्रात आंध, गोंड, राजगोंड, कोकणा, वारली, ठाकूर, भिल्ल, कोरकू, धानका, तडवी, वारली यासह माडिया गोंड, कोलाम व कातकरी या प्रमुख आदिम जमातीसुद्धा आहेत. महाराष्ट्रातील आदिवासींना प्रादेशिकरित्या सह्याद्री विभाग, सातपुडा विभाग व गोंडवन विभाग या प्रमुख तीन गटात विभागले जाते.

महाराष्ट्राच्या प्रशासकीय रचनेतील महत्वपूर्ण विभाग म्हणजे मराठवाडा. मराठवाड्यातील प्राचीन इतिहास असलेला महत्त्वपूर्ण जिल्हा म्हणजे नांदेड. नंदीनगर, नंदिकड, नंदितट, नंदिकट आणि नंद्याल अशा ऐतिहासिक नावाने नांदेड प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. प्राचीन काळात नांदेड जिल्हा कल्याणी, चालुक्य आणि यादव राजवटीचा भाग असल्याचे नमूद आहे. सध्या स्थितीत क्षेत्रफळाच्या दृष्टीने नांदेड जिल्हा

महाराष्ट्रात अकराव्या क्रमांकाचा असून एकूण १६ तालुके व १६०३ गावे आहेत. सन २०११ च्या जनगणनेनुसार नांदेड जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ३३.५६ लक्ष असून जिल्ह्यातील आदिवासींची लोकसंख्या २.८२ लक्ष एवढी आहे. नांदेड जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ८.४० टक्के एवढे असलेले दिसून येते. नांदेड जिल्ह्यात आदिवासी जमाती प्रामुख्याने डोंगराळ व ग्रामीण भागात आढळून येतात. नांदेड जिल्ह्यात गोंड, कोलाम, भिल्ल, थोटी, परधान यासह 'आंध' ही जमात सर्वाधिक लोकसंख्या असलेली आदिवासी जमात म्हणून ओळखली जाते.

•आंध जमात

आंध जमात ही महाराष्ट्रातील प्रमुख जमातीपैकी एक आदिवासी जमात असून नांदेड जिल्ह्यातील सर्वात मोठ्या लोकसंख्येची आदिम जमात आहे. ही जमात सातवाहनापासून निर्माण झाली असल्याचे मानतात. आंध्र या शब्दापासून आंध या शब्दाची उत्पत्ती मानतात. महाराष्ट्र व आंध्रप्रदेशाच्या सीमेवर असणाऱ्या जिल्ह्यात ही जमात प्रामुख्याने दिसून येते. ही जमात आंध्रप्रदेशातून महाराष्ट्रात स्थलांतरित झाल्याचे समजते. आंध्रप्रदेश लगतच्या क्षेत्रातून येणाऱ्या तेलगू भाषिक लोकांचा प्रभाव आंध जमातीवर दिसून येतो. आंध जमातीच्या इतिहासाचे अध्ययन अल्प प्रमाणात झालेले आहे.

सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक बाबतीत आंध जमात वैशिष्ट्यपूर्ण ठरते. नांदेड जिल्ह्यातील आदिवासी जनजीवन अभ्यासतांना आंध जमातीचे महत्त्वपूर्ण स्थान आहे.

सामाजिक विकास

सामाजिक विकास समाजातील सर्व व्यक्तींच्या विकासाशी संबंधित आहे; ज्यात समाजातील प्रत्येक व्यक्तीचा जीवनस्तर सुधारणे अपेक्षित आहे. मानवाचा सामाजिक विकास त्याच्या शिक्षण, आरोग्य व सामाजिक कल्याणाशी संबंधित आहे. तसेच संस्थात्मक सुधारणा व सामाजिक न्याय हे मुख्य सूत्र आहे. याचा अर्थ न्यायाशिवाय सामाजिक विकास

शक्य नाही. अशा प्रकारे सामाजिक विकास ही संकल्पना आर्थिक विकासाशी संबंधित असली तरी सामाजिक न्यायाचे मूल्य अत्यंत महत्त्वाचे आहे.

आंध जमातीचा सामाजिक विकास

सामाजिक विकासाच्या उद्देशाचे अध्ययन केल्यास आणि सामाजिक विकासात अंतर्भूत असलेल्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय दृष्टीने आंध जमातीचा विकास फारसा झालेला दिसून येत नाही. सोबत सामाजिक न्यायाच्या मुल्याबाबत आंध समुदायास फार दूर ठेवल्याचे चित्र समाजात दिसून येते. सामाजिक विकासात प्रत्येक घटक महत्त्वाचा असल्यामुळे चांगले जीवन जगण्याची संधी नाकारता येत नाही. मात्र आजही आंध जमातीतील सर्व लोक सुख सोयीयुक्त चांगले जीवन जगत आहे असे म्हणता येत नाही.

आदिवासीकरिता विकास योजना

आदिवासी समुदायाच्या कल्याणासाठी विविध प्रकारच्या योजना राबविण्यात येतात. यापैकी काही योजना पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

अ)शैक्षणिक योजना

भारतीय संविधानाच्या कलम ४५ अन्वये राज्यांनी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची संधी सर्वांना उपलब्ध करून द्याव्यात असे नमूद करण्यात आले असून अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाकरीता खास प्रयत्न करण्यात यावेत असे कलम ४६ मध्ये नमूद करण्यात आले आहे. आदिवासी समुदायाच्या नवीन पिढीला शिक्षणाची सोय व्हावी म्हणून आश्रम शाळा व वस्तिगृहे उघडण्यात आलेले आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षणाचा खर्च भागवता यावा यासाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. अभियांत्रिकी, वैद्यकीय तथा व्यावसायिक शिक्षणात अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत.

आर्थिक विकासाच्या योजना

आदिवासी समुदायाची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी शासन अल्प व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देते. आदिवासी कल्याण कार्यक्रमात शेतीला अग्रक्रम देण्यात आले आहे. त्याअंतर्गत शेत जमीन उपलब्ध करून देणे, आदिवासीच्या शेत जमीन खरेदी-विक्री व्यवहार फक्त आदिवासीमध्ये करण्याबाबतचा कायदा, शेती व बियाणांकरिता शासन अल्प व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देते, यासोबत कर्जावर सबसिडी सुद्धा देते. शेतीला पूरक उद्योगासाठी कर्जे उपलब्ध करून देणे, व्यवसायिक तंत्र कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण देणे, पशुपालन कुक्कुटपालन, वराहपालन यासाठी शासनातर्फे विशेष प्रयत्न केले जातात. लघुउद्योगासाठी आर्थिक सहाय्य करून कर्जावर सूट दिली जाते.

आदिवासी समुदायासाठी खावटी अनुदान योजना महाराष्ट्र शासनातर्फे चालविली जाते. शबरी आदिवासी विकास घरकुल योजनाद्वारे अनुसूचित जमातीसाठी घरे व वसाहतीसाठी अनुदान देण्यात येते.

आरोग्य योजना

आंध जमातीमध्ये आरोग्यविषयक प्रश्न अत्यंत गंभीर आहे. आंध जमात डोंगराळ व ग्रामीण भागात वास्तव्य करीत असल्यामुळे वैद्यकीय सोयींची अत्यंत गरज आहे. त्यांच्या अंधश्रद्धा, रूढी, परंपरासह अपुरा व निकृष्ट आहार, दारिद्र्य व बेरोजगारी यामुळे त्यांचे स्वास्थ्य रक्षणासाठी विशेष तरतूद आदिवासी कार्यक्रमात करण्यात आली आहे. स्वच्छ पिण्याच्या पाण्याची तरतूद, फिरते दवाखाने, मोफत औषध वाटप, कुष्ठरोग निवारण केंद्रे, सुरक्षित प्रसूतीसाठी प्रसूतीगृह व प्रसूती दवाखान्यात केल्यास अनुदान प्राप्ती, गरोदर मातांची नियमित मोफत तपासणी, गरोदर व स्तनदा मातांना सकस मोफत आहार वाटप, मोफत शिशु आहार वाटप इत्यादी योजनांद्वारे आरोग्य विकासाबाबत शासन स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहे.

राजकीय सहभाग

अनुसूचित जमातीचा राजकीय क्षेत्रात सहभाग वाढावा यासाठी लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत स्तरावर राखीव जागा ठेवण्यात येतात. आदिवासी विकास मंत्रालयाचा मंत्री हा आदिवासी जमातीचा असणे अनिवार्य असते. राजकीय विकासासाठी अनुसूचित जमातीच्या प्रतिनिधित्वांसाठी शासन स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहे. असे असले तरी आदिवासी जमातीच्या राजकीय सहभागाचे प्रमाण अल्प दिसून येते. अनुसूचित जमातीच्या आरक्षित जागेव्यतिरिक्त बिगर आदिवासी क्षेत्रात आदिवासींना प्रतिनिधित्व देण्याचे प्रमाण बोटावर मोजण्याइतपत दिसून येते. आरक्षित जागेव्यतिरिक्त निवडणुकीत प्रमुख पक्षाकडून उमेदवारी सुद्धा मिळत नाही. याबाबत नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीची स्थिती फारशी वेगळी दिसून येत नाही. तात्पर्य आंध जमातीचा राजकीय सहभाग अल्प असून राजकीय प्रतिनिधित्वाचे प्रमाण कमी आहे.

सामाजिक परिवर्तन

कोणत्याही मानवी समाजाचे निरीक्षण केले तर समाजात सतत बदल होत असतात. ही बदलाची प्रक्रिया समाजात सर्व क्षेत्रात आढळते म्हणून सामाजिक बदल हा मानवी स्वभावाचा एक गुणधर्मच आहे ज्यात प्रत्येक व्यक्तीला नवे विचार आचार हवेसे वाटतात. तो स्वाभाविकच हा बदल करण्यासाठी प्रयत्न करीत असतो. त्यामुळेच समाज स्थिर न राहता परिवर्तनशील बनला आहे. सामाजिक परिवर्तन हा प्रगतीचा आत्मा आहे कारण परिवर्तनाशिवाय प्रगतीच होऊ शकत नाही.

आंध जमातीतील सामाजिक परिवर्तन

सामाजिक परिवर्तन प्रत्येक मानवी समुहात होत असतो. आंध ही नांदेड जिल्ह्यातील प्रमुख आदिवासी जमात आहे. आंध जमातींमध्येही सामाजिक परिवर्तन झालेले दिसून येते.

१९६१ नंतर २०११ पर्यंतच्या कालखंड दरम्यान आंध जमातीची लोकसंख्या वाढलेली असल्याचे दिसून येते. १९६१ मध्ये आंध जमातीची लोकसंख्या २१,५५८ होती. २०११ मध्ये ६७,७४४ लोकसंख्या झाल्याचे दिसून येते. आंध जमातीच्या समाज रचनेवर व समाजव्यवस्थेत लोकसंख्येच्या घटकाचा परिणाम होऊन सामाजिक परिवर्तन झाल्याचे दिसून येते.

तांत्रिक घटकांमुळे आंध जमातीमध्ये सामाजिक परिवर्तन झालेले दिसून येते. उत्पादन तंत्रातील बदलामुळे जीवनाच्या सर्व अंगाचे यांत्रिकीकरण होत जाते. आंध जमातीत तांत्रिक ज्ञानबाबत मागासलेपणा असल्यामुळे बेकारीचा प्रश्न, कमी मजुरीत काम करणे इत्यादी समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते.

तांत्रिकतेमुळे दळणवळणाच्या व वाहतुकीच्या साधनात वाढ झाली. आंध जमातीचा शहराशी व इतर समाजाशी संपर्क आला. त्यामधून शहरात कामासाठी आलेल्या अर्थोत्पादनासाठी, व्यवसायासाठी शहराकडे, औद्योगिक वस्तीकडे आंध समुदायाने धाव घेतल्यामुळे कुटुंबापासून विभक्त राहण्याची वेळ कुटुंबप्रमुखावर येते. अर्थोत्पादनात गुंतून राहिल्यामुळे स्वगावातील कुटुंबाची वाताहत होते. आंध जमातीचे मोठ्या प्रमाणात स्थलांतरण झाल्याचे दिसून येते. शहराचे आकर्षक जीवनाकडे आंध जमातीचे लोकसुद्धा आकर्षित झाले आणि त्यामधून स्वतःची संस्कृती, मूल्ये, परंपरा विसरणे, कुटुंबाच्या रचनेत व कार्यात बदल झालेला दिसून येतो. या सोबत अनेक समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते.

तांत्रिक घटकाच्या बदलामुळे राज्यसंस्थेच्या कार्यात परिवर्तन झालेले आहे. आंध पंचायत म्हणजे मोहतारीयाचे अस्तित्व नष्ट होण्याच्या मार्गावर दिसून येते. अशा प्रकारे आंध लोकांच्या कौटुंबिक, आर्थिक, समाजजीवन, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रात थोड्या फार विकासात्मक परिवर्तन झाल्याचे दिसून येत आले तरी परिवर्तनाची गती मात्र संथ आहे.

आंध जमातीतील सामाजिक परिवर्तन व सामाजिक विकासाची तुलनात्मक स्थिती

नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीचे समाज जीवन विशेष प्रकारचे आहे. आंध जमात रूढी, परंपरा मानणारी असून साधी, भोळी जमात आहे. आंध जमात प्रामाणिक जमात असल्याचे दिसून येते. डोंगर दऱ्यात, निसर्ग सान्निध्यात राहत असून जगाशी संपर्क प्रस्थापित करण्यासाठी रस्ते बांधण्यात आले मात्र पक्क्या रस्त्याचे प्रमाण कमी आहे. आंध आदिवासी विद्यार्थी शिक्षणाच्या सोयी सवलतींचा उपयोग घेत असले असले तरी शिक्षणाच्या वाढीचे प्रमाण मंद गतीने आहे. आंध जमातीच्या अज्ञान, निरक्षरता व साधेपणामुळे विविध योजनांचा पूर्ण लाभ त्यांना प्राप्त झालेला दिसून येत नाही. दारिद्र्य व बेरोजगारीच्या चक्रातून आंध्र समुदाय बाहेर आलेला नाही.

विजेची सोय असूनही दारिद्र्यामुळे अंधारात राहावे लागते. आंध जमातीची कला, साहित्य संवर्धनासाठी विशेष प्रयत्नांची गरज असून सांस्कृतिक केंद्र स्थापन करण्याची गरज आहे. तात्पर्य आदिवासी समाजाप्रमाणे शहरी सोयीसुविधा आंध जमातीपर्यंत पोहोचल्याचे प्रमाण कमी असून त्यांचा लाभ घेताना अनेक अडचणी निर्माण झालेल्या दिसून येतात. आंध जमातीच्या सामाजिक विकासाचा वेग विशेष दिसून येत नाही त्यामुळे सामाजिक परिवर्तनास वेग नाही.

२)अध्ययन विषयाची निवड

नांदेड जिल्ह्यातील आंध ही प्रमुख आदिवासी जमात असलेली दिसून येते. नांदेड जिल्ह्यातील आदिवासी विकासाबाबत विचार करतांना आंध जमातीचा प्रामुख्याने विचार करणे गरजेचे ठरते. नांदेड जिल्ह्यातील आदिवासी समुदायाच्या अध्ययनात आंध जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन करणे महत्वाचे ठरते. यादृष्टीने **" आंध जमातीतील सामाजिक परिवर्तन आणि विकासाचा तौलानिक अभ्यास (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा) "** या विषयाची निवड करण्यात आली आहे.

आंध जमातीचा शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकासाचा वेग मंद असलेला दिसून येतो. आधुनिकीकरणाच्या जगात आंध जमातीच्या समाजजीवनात काय बदल झालेत? आधुनिक काळात अनेक घटकांमुळे विभिन्न समस्या निर्माण झालेल्या आहेत त्याचा प्रभाव नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीवर कितपत झाला ? आंध समुदायातील सामाजिक परिवर्तनाचे अध्ययन करणे अत्यंत महत्वाचे ठरते.

आंध जमातीच्या वैशिष्ट्यपूर्ण परंपरा, आर्थिक जीवन, शैक्षणिक स्थिती, सांस्कृतिक व धार्मिक जीवन या सर्व बाबींमुळे आंध जमातीचे अध्ययन करणे फार महत्त्वाचे ठरते. आंध जमातीची राजकीय सहभागिता अभ्यासणे आजच्या काळात महत्वपूर्ण ठरते. नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीमध्ये सुद्धा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक इत्यादी समस्या निर्माण झालेल्या आहेत काय ? त्या समस्यांचे स्वरूप कसे ? याकरिता सदर अध्ययन विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

नांदेड जिल्ह्याच्या संदर्भात आदिवासी विकास योजनांची आखणी करण्यासाठी आंध जमातीचे अध्ययन उपयुक्त ठरते. पूर्वीच्या आदिवासी विकास योजनांचा लाभ किती आंध लोकांना मिळाला ? आंध समुदायाला योजनेचा प्रत्यक्ष मिळालेला लाभ किती ? त्यामधून आंध जमातीचा विकास किती झाला ? या सर्व प्रश्नाच्या अनुषंगाने **" आंध जमातीतील सामाजिक परिवर्तन आणि विकासाचा तौलानिक अभ्यास (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा) "** या विषयाची निवड करण्यात आली.

तात्पर्य नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन आताच्या काळात महत्वपूर्ण व आवश्यक असल्यामुळे संशोधकास सदर संशोधन करणे महत्त्वाचे वाटले.

३) अध्ययन विषयाची उद्दिष्टे

१) नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीचे अध्ययन करणे.

२) नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीतील सामाजिक परिवर्तनास कारणीभूत घटकांचे अध्ययन करणे.

३) नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीतील सामाजिक परिवर्तनाचे अध्ययन करणे.

४) नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीच्या विकासाचे मूल्यमापन करणे.

५) नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीतील सामाजिक परिवर्तन व विकासाचे तौलानिक अध्ययन करणे

६)नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीच्या उन्नतीसाठी शिफारशी करणे.

४) अध्ययन विषयाची गृहितकृत्ये

१) नांदेड जिल्ह्यातील आंध ही एक प्रमुख जमात असून तिला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे.

२) नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीतील सामाजिक परिवर्तनास विविध घटक कारणीभूत असून सामाजिक परिवर्तनाची गती संथ आहे.

३) नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीच्या सामजिक विकासाची गती संथ आहे.

४) नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीची आर्थिक स्थिती हलाखीची असून शैक्षणिक विकासाची गती मंद आहे.

५) नांदेड जिल्ह्यातील आंध जमात शासकीय योजनांचे लाभार्थी असून राजकीय सहभाग अल्प आहेत.

६) नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीचा विकास व सामाजिक परिवर्तनाचा संबंध आहे.

५) अध्ययनाचे महत्त्व

नांदेड जिल्ह्याच्या संदर्भात आदिवासी विकास योजनांची आखणी करण्यासाठी आंध जमातीचे अध्ययन उपयुक्त ठरते. आंध आदिवासीच्या अध्ययनाचे महत्त्व पुढील बाबींवरून दिसून येते.

१) या अध्ययनामुळे आंध जमातीबाबत विशेष माहितीच्या ज्ञानात वाढ होईल.

२) आंध जमातीच्या आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य व इतर समस्या कळण्यास मदत होईल.

३) आंध समुदायाला प्राप्त योजना, प्रत्यक्ष मिळालेला लाभ याबाबत माहिती मिळण्यास मदत होईल.

४) या संशोधनाचा विद्यार्थी, संशोधक, विविध संस्था, सामाजिक कार्यकर्ते, सामाजिक चळवळीचे कार्यकर्ते यांना फायदा होईल.

५) आंध जमातीच्या समस्या सोडवणुकीसाठी झालेले प्रयत्न, कोणत्या शासकीय योजना सुरु ठेवाव्यात ? योजनांची अंमलबजावणीतील कोणते बदल करावेत ? या सर्व प्रश्नांची उकल करणे संशोधाकास महत्त्वाचे वाटले.

एकंदरीत **" आंध जमातीतील सामाजिक परिवर्तन आणि विकासाचा तौलानिक अभ्यास (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा) "** या संशोधन विषयाच्या अध्ययनाचे विविधांगी महत्त्व आहे.

६) अध्ययनाची व्याप्ती व मर्यादा

सदर संशोधनात नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन करतांना संशोधनाची भौगोलिक व्याप्ती नांदेड जिल्ह्यातील संपूर्ण ग्रामीण, शहरी क्षेत्रासह सर्व १६ तालुके राहील. सदर संशोधनात नांदेड जिल्ह्यातील फक्त आंध जमातीच्या सर्व वयोगटातील लोकांचा समावेश करण्यात येईल.

७) पूर्व संशोधन साहित्याचा आढावा

सदर संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी यापूर्वी झालेल्या पूर्व संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात येईल. काही प्रमुख संदर्भ साहित्याचा आढावा पुढीलप्रमाणे.

१) गारे गोविंद (२००१) यांनी 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती' या पुस्तकात आदिवासी जमातीच्या आर्थिक समस्या, आरोग्य व व्यसन समस्येवर विवेचन केले आहे.

२) गारे गोविंद (२००१) यांनी 'पैनगंगा नदीच्या खोऱ्यातील आंध आदिवासी' या पुस्तकाद्वारे आंध जमातीच्या समाजजीवनावर प्रकाश टाकलेला आहे.

३) शिंदे पंडित मुंजाजी (२००१) यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे समाजशास्त्र विषयात पीएच.डी. पदवीकरीता 'मराठवाड्यातील आंध आदिवासी समुदायातील सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास' या विषयावर प्रबंध सदर केलेला आहे.

४) धनजकर राजेश (२०१०) यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे मराठी विषयात पीएच.डी. पदवीकरीता 'मराठवाड्यातील आंध जमातीच्या लोकसाहित्याचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर शोधप्रबंध सादर केलेला आहे.

५) धनजकर राजेश (२०१३) यांनी 'मराठवाड्यातील आंध जमातीचे लोकसाहित्य' या पुस्तकात आंध जमातीची लोकगीते, लोककथा, लोकनाट्ये, म्हणी, उखाणे तथा सामाजिक पार्श्वभूमीबाबत विस्तृत विवेचन केलेले आहे.

६) ढोले शेकोबा परशुराम (२०१७) यांनी 'आदिवासी विकास योजनांचे मूल्यमापन एक समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा)' या विषयावर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे समाजशास्त्र   विषयात पीएच.डी. करीता शोधप्रबंध सादर केलेला आहे.

७) भालेराव साहेबराव पंढरीनाथ (२०१८) यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठाच्या समाजशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीकरिता 'आंध आदिवासी जमातीतील स्त्री-शिक्षणाचा दर्जा व परिवर्तन: एक समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा)' या विषयावर शोधप्रबंध सादर केलेला आहे.

वरील पूर्व संशोधन साहित्याच्या अध्ययनांती असे दिसून येते की, नांदेड जिल्ह्याच्या विशेष संदर्भात आंध जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन झाल्याचे दिसून येत नाही. नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक समस्यांबाबत फारसे अध्ययन झालेले दिसून येत नाही. नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीच्या स्त्रियांच्या विशेष संदर्भात अध्ययन झाल्याचे दिसून येत नाही. यापूर्वीचे संशोधन व सदर संशोधनात भौगोलिक अध्ययन क्षेत्र, जनसंख्या व नमुना आणि कालखंडाबाबत रिक्त पोकळी निर्माण झालेली दिसून येते. ही पोकळी भरून निघावी याकरीता संशोधकाने सदर विषयासंदर्भात संशोधन करण्याचे ठरविले.

८) संशोधन पद्धती

संशोधन करतांना शास्त्रीय पद्धतीचा वापर करणे म्हणजे संशोधन पद्धती होय. सदर संशोधनात नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीचे कौटुंबिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय स्थितीचे अध्ययन सद्य: स्थितीत करण्यात येईल. यासाठी नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीच्या लोकांचे सर्वेक्षण करण्यात येईल. यासाठी सदर संशोधनात प्रामुख्याने सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल. यासोबतच द्वितीयक तथ्ये संकलित करण्यात येईल.

८.१ अध्ययन क्षेत्र

नांदेड जिल्ह्यातील आंध जमात सर्वात मोठी प्रमुख आदिवासी जमात आहे. नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण व डोंगराळ भागात आंध जमात प्रामुख्याने वास्तव्य करीत असली तरी सदर संशोधनाचे क्षेत्र संपूर्ण नांदेड जिल्हा राहील. नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा समावेश संशोधन क्षेत्रात असेल.

८.२ संशोधन आराखडा

संशोधन संदर्भात पूर्व नियोजन, संशोधनाची दिशा व संभाव्य समस्या संदर्भात केलेली योजना आखणी म्हणजे संशोधन आराखडा होय. सदर संशोधनात नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन करतांना आंधाची कौटुंबिक,सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय स्थितीचे सद्य: स्थितीतील अध्ययन सर्वेक्षण पद्धतीने करावयाचे आहे. त्यामुळे वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर करणे सदर संशोधनासाठी उपयुक्त राहील.

८.३ नमुना निवड

संशोधनात वेळ, श्रम व पैशाच्या बचतीकरिता समग्र किंवा विश्वातील काही एककांची निवड करणे म्हणजे नमुना निवड होय. सदर संशोधनाकरिता नांदेड जिल्ह्यातील ४०० आंध कुटुंबाची निवड संभाव्यता निवड प्रकारातील सरल यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने करण्यात येईल.

८.४ तथ्य संकलन

संपूर्ण संशोधन तथ्य संकलनावर अवलंबून असते म्हणून संशोधनात तथ्य संकलनाचे अत्यंत महत्त्व आहे. सदर संशोधनात आंध कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात येईल. आंध जमातीचे कुटुंब प्रमुख व इतर सदस्यांकडून महत्त्वपूर्ण तथ्ये संकलित केली जातील.

आंधाची घरे, आहार, पोषाख, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय जीवनाचे अध्ययन करण्यासाठी सर्वेक्षण, निरीक्षण, प्रश्नावली, मुलाखत व अनुसूची या साधनतंत्राद्वारे प्राथमिक तथ्ये संकलित केली जातील. यासोबत विविध संदर्भ पुस्तके, वर्तमानपत्रे, गॅझेटिअर, शासकीय योजना व त्यांचे अहवाल, स्वयंसेवी संस्थाचे कार्य, आदिवासी विकासासंदर्भात कार्य करणारे व्यक्ती व संस्थाद्वारे प्राप्त माहिती यांचे सुद्धा अध्ययन करून सदर संशोधनासाठी द्वितीय तथ्ये संकलित करण्यात येईल.

प्राथमिक व द्वितीयक तथ्ये संकलित केल्यानंतर सारणीकरण, सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन करून निष्कर्ष मांडण्यात येतील.

९) प्रकरण रचना

संशोधन कार्य पूर्ण केल्यानंतर संशोधन कार्य लिखित स्वरूपात प्रस्तुत करणे आवश्यक असते. संशोधन कार्य कसे पूर्ण झाले याचे प्रतिबिंब म्हणजे संशोधन अहवाल लेखन होय. सदर संशोधन कार्यासंदर्भात पुढीलप्रमाणे प्रकरण रचना राहील.

प्रकरण पहिले - प्रस्तावना

या प्रकरणामध्ये संशोधन विषयाबाबत प्रस्तावना, संशोधन विषयाची निवड, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितकृत्ये, अध्ययन विषयाचे महत्त्व, अध्ययनाची व्याप्ती व मर्यादा बाबत माहिती देण्यात येईल.

प्रकरण दुसरे - संशोधन पद्धती व पूर्व संशोधन साहित्याचा आढावा

सदर संशोधनासाठी वापरण्यात येणारी संशोधन पद्धती, संशोधन आराखडा, अध्ययन क्षेत्र, नमुना निवड व तथ्य संकलन बाबत माहिती देण्यात येईल. सदरील प्रकरणामध्ये पूर्व संशोधन साहित्याचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे - नांदेड जिल्ह्यातील आंध जमात

या प्रकरणामध्ये आंध जमातीबद्दल ऐतिहासिक माहिती देण्यात येईल. आंध जमातीचा पूर्व इतिहास, त्यांचे भौगोलिक वास्तव्य, आंध जमातीच्या समूह, गट, कौटुंबिक

जीवन, घरे, आहार, पोषाख, परंपरा, त्यांचे धार्मिक जीवन , विवाह पद्धती, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाबद्दल सविस्तर माहिती लेखन करण्यात येईल.

प्रकरण चौथे - नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय विकासाची सद्यस्थिती

या प्रकरणामध्ये नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीच्या लोकांकडून प्राप्त प्रतिसादावरून सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय विकासाच्या सद्यस्थितीचे सखोल अध्ययन करण्यात येईल.

प्रकरण पाचवे - नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीतील सामाजिक परिवर्तन

या प्रकरणामध्ये मुलाखत अनुसुचीद्वारे नांदेड जिल्ह्यातील आंध लोकांकडून प्राप्त प्रतिसादावरून सामाजिक परिवर्तन बाबत सविस्तर विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण सहावे - नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीतील सामाजिक परिवर्तन व विकासाची तौलानिक स्थिती

सदर प्रकरणामध्ये नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीतील सामाजिक परिवर्तन व विकासाची तौलानिक स्थितीचे विवेचन करण्यात येईल.

प्रकरण सातवे - निष्कर्ष व शिफारशी

प्रकरण एक ते सहा मधील अध्ययनातून गृहितकृत्यांची पडताळणी करण्यात येईल. अध्ययनातून प्राप्त निष्कर्षांची मांडणी करण्यात येईल. नांदेड जिल्ह्यातील आंध जमातीच्या उन्नतीसाठी आवश्यक त्या शिफारशी करण्यात येतील.

संदर्भ ग्रंथसूची व परिशिष्ट्ये

•संदर्भ ग्रंथसूची

१) आगलावे प्रदीप नागोराव,(२०००),"संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे",नागपूर,विद्या प्रकाशन.

२) बोबडे प्रकाश व लोटे,रा.ज.,(१९९७),"सामाजिक मानवशास्त्र",नागपूर,पिंपळापुरे आणि कं.पब्लिशर्स,(दुसरी आवृत्ती).

३) Census Paper 1 of 2011 : Provisional Population Totals : The Registrar General and Census Commissioner in series Census of India - Maharashtra.

४) चवरे रा.गो.,(२०१०)"आंध जमात: साहित्य आणि संस्कृती",अमरावती,मराठी जनसाहित्य परिषद.

५) धनजकर राजेश,(२०११),"आदिवासी आंधाची लोकगीते",परभणी,साधनां प्रकाशन.

६) धनजकर राजेश,(२०१२)," आंध जमात: शोध आणि बोध",नांदेड,अनुराधा पब्लिकेशन.

७) धनजकर राजेश, (२०१३),"मराठवाड्यातील आंध जमातीचे लोकसाहित्य", नांदेड, अनुराधा पब्लिकेशन.

८) गारे गोविंद,(१९८९),"आदिवासींची लोकनृत्ये",पुणे,कौंटीनेन्टल प्रकाशन.

९) गारे गोविंद,(१९९७),"आदिवासींचे शिक्षण",औरंगाबाद,साकेत प्रकाशन.

१०) गारे गोविंद,(२००१),"महाराष्ट्रातील आदिवासी जमाती ", पुणे,कौंटीनेन्टल प्रकाशन.

११) गारे गोविंद,(२००१),"पैनगंगा नदीच्या खोऱ्यातील आंध आदिवासी",पुणे,श्रीविद्या प्रकाशन.

१२) नाडगोंडे गुरुनाथ,(१९७९),"भारतीय आदिवासी",पुणे,कौंटीनेन्टल प्रकाशन.

१३) नांदेड जिल्हा गॅझेटिअर भाग १ व भाग २.

१४) सवदी ए.बी.,(२०१७)"महाराष्ट्राचा भूगोल",पुणे,निराली प्रकाशन,(सातवी आवृत्ती).

१५) Young P.V.,(1968),"Scientific Social Surveys and Research", New Delhi, Prentice Hall of India.

१६)www.shodhganga.inflibnet.ac.in

१७)www.idjo.org

• पीएच.डी. शोधप्रबंध सूची

१) भालेराव साहेबराव पंढरीनाथ (२०१८), "आंध आदिवासी जमातीतील स्त्री-शिक्षणाचा दर्जा व परिवर्तन: एक समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा)", पीएच.डी. (समाजशास्त्र), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.(अप्रकाशित पीएच.डी शोधप्रबंध).

२) धनजकर राजेश (२०१०), "मराठवाड्यातील आंध जमातीच्या लोकसाहित्याचा चिकित्सक अभ्यास", पीएच.डी.(मराठी), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.(प्रकाशित पीएच.डी शोधप्रबंध).

३) ढोले शेकोबा परशुराम (२०१७), "आदिवासी विकास योजनांचे मूल्यमापन एक समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा)", पीएच.डी.(समाजशास्त्र), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड. (अप्रकाशित पीएच.डी शोधप्रबंध)

४) गोरे प्रल्हाद आश्रुजी (२०१८), "आंध आदिवासी वृद्धांच्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक समस्याचे समाजशास्त्रीय अध्ययन: विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा", पीएच.डी.(समाजशास्त्र), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.(अप्रकाशित पीएच.डी शोधप्रबंध).

५) म्हस्के विठोबा दामोधर (२०१४), "आंध आदिवासी जमातीतील स्त्री-पुरुष लोकगीतांचे अध्ययन", पीएच.डी.(मराठी), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.(अप्रकाशित पीएच.डी शोधप्रबंध).

६) शिंदे पंडित मुंजाजी (२००१), "मराठवाड्यातील आंध आदिवासी समुदायातील सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास", पीएच.डी.(समाजशास्त्र), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.(अप्रकाशित पीएच.डी शोधप्रबंध).

७) झाल्टे ज्योती मुकुंदराव (२०१८), "मराठवाड्यातील प्रमुख आदिवासी जमाती व त्यांच्या बोली : एक अभ्यास (विशेष संदर्भ- आंध, गोंड, भिल्ल, परधान व पारधी)", पीएच.डी.(मराठी), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.(अप्रकाशित पीएच.डी शोधप्रबंध).

संशोधक	**मार्गदर्शक**
अरुण लक्ष्मीनारायण धकाते	**डॉ. शेकोबा परशुराम ढोले** **सहायक प्राध्यापक** **श्री.दत्त कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,** **हदगाव, जिल्हा नांदेड**